भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०

**( सन १९२० चा अधिनियम क्रमांक ३३ )**

[ ३० जून २०१६ रोजी यथाविद्यमान ]

# The Identification of Prisoners Act, 1920

**(Act No. 33 of 1920)**

*[As in force on the 30th June 2016]*


संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

**२०१६**

[ **किंमत** : रुपये २०]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३० जून २०१६ रोजी यथाविद्यमान असलेला दि आईडेण्टिफिकेशन ऑफ प्रिजनर्स ॲक्ट, १९२० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १७, अंक २, दिनांक २२ सप्टेंबर २०१६ यात पृष्ठे १० ते ११ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतीच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ सप्टेंबर २०१६.

**डॉ. जी. नारायण राजू,**
सचिव, भारत सरकार.

# PREFACE

This edition of the Identification of Prisoners Act, 1920 as on the 30th June 2016, contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, Vol. 17, No. 2, dated 22nd September 2016 on pages 10 to 11.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd September 2016.

DR. G. NARAYAN RAJU,
Secretary to the Government of India.

(शा.म.मु.) एच ४०१६ (१,०६८—१२-२०१६)

# कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व व्याप्ती.

२. व्याख्या.

३. सिद्धदोषी व्यक्तींची मापे, इत्यादी घेणे.

४. सिद्धदोषी न झालेल्या व्यक्तींची मापे, इत्यादी घेणे.

५. एखाद्या व्यक्तीने आपली मापे किंवा छायाचित्रे घेऊ द्यावीत यासाठी आदेश देण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार.

६. मापे, इत्यादी घेऊन देण्यास प्रतिकार.

७. दोषमुक्तीनंतर छायाचित्रे व मापांचा अभिलेख, इत्यादी नष्ट करणे.

८. नियम करण्याचा अधिकार.

९. दावारोध.

# कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०

(१९२० चा अधिनियम क्रमांक ३३)[१]

[३० जून २०१६ रोजी यथाविद्यमान ]

[९ सप्टेंबर, १९२०]

**सिद्धदोषी व्यक्ती व इतर व्यक्ती यांची मापे व छायाचित्रे घेण्याचा प्राधिकार देण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** सिद्धदोषी व्यक्ती व इतर व्यक्ती यांची मापे व छायाचित्रे घेण्यासाठी प्राधिकार देणे समयोचित आहे ; **त्याअर्थी** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व व्याप्ती.**

**१.** (१) या अधिनियमास, कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२० असे म्हणावे ; आणि

[२] [(२) तो, संपूर्ण भारतास [३] [१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी भाग ख मधील राज्यांमध्ये समाविष्ट होती ती राज्यक्षेत्रे वगळून] लागू असेल.]

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात विषयानुसार किंवा संदर्भानुसार कोणताही प्रतिकूल अर्थ नसेल तर,—

(क) " मापे " या संज्ञेत, बोटांचे ठसे आणि पावलांचे ठसे, याचा समावेश आहे ;

**१८९८ चा ५.** (ख) " पोलीस अधिकारी " याचा अर्थ, पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकारी, [४] फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या प्रकरण चौदा अन्वये अन्वेषण करणारा पोलीस अधिकारी किंवा पोलीस उप निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा इतर कोणताही पोलीस अधिकारी, असा आहे ; आणि

(ग) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे.

**सिद्धदोषी व्यक्तींची मापे, इत्यादी घेणे.**

**३.** (क) जिला एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या कोणत्याही अपराधासाठी किंवा तद्नंतरच्या ज्या अपराधाच्या दोषसिद्धीनंतर ती वाढीव शिक्षेस पात्र ठरेल अशा कोणत्याही अपराधासाठी सिद्धदोषी ठरविण्यात आले असेल ; किंवा

**१८९८ चा ५.** (ख) जिला [५] फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या कलम ११८ अन्वये तिच्या चांगल्या वर्तणुकीकरिता जामीन देण्याचा आदेश देण्यात आला असेल,

अशी प्रत्येक व्यक्ती, तिला फर्माविण्यात आल्यास पोलीस अधिकाऱ्याला विहित रीतीने आपली मापे व छायाचित्रे घेऊ देईल.

**सिद्धदोषी न झालेल्या व्यक्तींची मापे, इत्यादी घेणे.**

**४.** जिला एका वर्षाच्या किंवा त्यापेक्षा अधिक मुदतीच्या सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाच्या संबंधात अटक करण्यात आली आहे अशी कोणतीही व्यक्ती, पोलीस अधिकाऱ्याकडून तिला फर्मावण्यात आले तर, तिची मापे विहित रीतीने घेऊ देईल.

**एखाद्या व्यक्तीने आपली मापे किंवा छायाचित्रे घेऊ द्यावीत यासाठी आदेश देण्याचा दंडाधिकाऱ्याचा अधिकार.**

**१८९८ चा ५.** **५.** [६] फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ खालील कोणत्याही अन्वेषणाच्या किंवा कार्यवाहीच्या प्रयोजनांसाठी एखाद्या व्यक्तीस तिचे माप घेऊ द्यावे किंवा छायाचित्र काढू द्यावे यासाठी निदेश देणे इष्ट आहे, अशी दंडाधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, त्यास तशा आशयाचा आदेश काढता येईल, आणि त्या प्रकरणात असा आदेश ज्या व्यक्तीशी संबंधित असेल त्या व्यक्तीस आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वेळी व अशा ठिकाणी हजर करण्यात येईल किंवा ती उपस्थित राहील आणि यथास्थिति, पोलीस अधिकाऱ्याला ती आपली मापे किंवा छायाचित्रे घेऊ देईल :

परंतु असे की, प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याखेरीज इतर कोणालाही, एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र काढू देण्यासाठी निदेश देणारा कोणताही आदेश काढता येणार नाही :

---

१. या अधिनियमात, तो मुंबईस लागू होत असताना १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, १९३५ चा ४, १९३५ चा २१, १९५९ चा ५६ याद्वारे आणि महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९७० चा ३५ याद्वारे महाराष्ट्राला लागू होत असताना सुधारणा करण्यात आली आहे.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पोटकलम २ ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला आहे.

३. विधि अनुकूलन (क्र.३) आदेश, १९५६ द्वारे " भाग ख राज्य " ऐवजी दाखल करण्यात आला आहे.

४. आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे प्रकरण नऊ पहा.

५. आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याचे कलम ११७ पहा.

६. आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

परंतु आणखी असे की, अशा अन्वेषणाच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधात एखाद्या व्यक्तीस काही वेळासाठी अटक करण्यात आली असल्याखेरीज, या कलमाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

**मापे, इत्यादी घेऊ देण्यास प्रतिकार.** **६.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाखाली तिची मापे किंवा छायाचित्र घेऊ देण्यास फर्माविण्यात आले असेल त्या व्यक्तीने छायाचित्रे किंवा मापे घेऊ देण्यास प्रतिकार केल्यास किंवा नकार दिल्यास, ती घेण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपायांचा वापर करणे विधिसंमत असेल.

(२) या अधिनियमाखाली मापे व छायाचित्रे घेऊ देण्यास प्रतिकार करणे किंवा नकार देणे हे भारतीय दंड संहिता याच्या **१८६० चा ४५.** कलम १८६ खाली अपराध असल्याचे मानण्यात येईल.

**दोषमुक्तीनंतर छायाचित्रे व मापांचा अभिलेख, इत्यादी नष्ट करणे.** **७.** एक वर्ष किंवा त्याच्यापेक्षा जास्त मुदतीकरिता सश्रम कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाबद्दल पूर्वी कधी दोषी ठरली नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीची, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार घेण्यात आलेली मापे किंवा घेण्यात आलेले छायाचित्र, हे कोणत्याही न्यायालयाकडून तिला न्यायचौकशीशिवाय किंवा विनादोषारोप किंवा दोषमुक्त करून, मुक्त करण्यात आले असेल तर, अशा प्रकारे घेण्यात आलेली सर्व मापे आणि सर्व छायाचित्रे [ तिची व्यस्तचित्रे (निगेटीव्ह) आणि प्रती दोन्ही ] ही, न्यायालयाने किंवा (न्यायचौकशीखेरीज अशा व्यक्तीस सोडून देण्यात आले असल्याच्या प्रकरणी) जिल्हादंडाधिकाऱ्याने किंवा उपविभागीय अधिकाऱ्याने लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव अन्यथा निदेश दिले नसल्यास, नष्ट करण्यात येतील किंवा तिच्याकडे सोपवण्यात येतील.

**नियम करण्याचा अधिकार.** **८.** (१) राज्य शासनास [१] [**राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करता येतील.

(२) विशेषतः आणि पूर्वगामी तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, अशा नियमात पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) कलम ५ अन्वये व्यक्तींची छायाचित्रे घेण्यावरील निर्बंध ;

(ख) ज्या ठिकाणी मापे आणि छायाचित्रे घेण्यात येतील ती ठिकाणे ;

(ग) ज्या स्वरूपात मापे घ्यावयाची असतील ते स्वरूप ;

(घ) ज्या पद्धतीने कोणत्याही प्रकारची किंवा प्रकारांची मापे घेण्यात येतील अशी पद्धत ;

(ङ) कलम ३ अन्वये छायाचित्र घेतेवेळी त्या व्यक्तीने परिधान करावयाचे कपडे ;

(च) मापांच्या आणि छायाचित्रांच्या अभिलेखांचे जतन, सुरक्षित अभिरक्षा, ते नष्ट करणे व त्यांची विल्हेवाट लावणे.

[१] [ (३) या कलमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळापुढे ठेवण्यात येईल.]

**दावारोध.** **९.** या अधिनियमाअन्वये किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमांन्वये, सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

---

१. १९८६ चा अधिनियम क्रमांक ४, कलम २ आणि अनुसूची यांद्वारे समाविष्ट करण्यात आला (दिनांक १५ मे १९८६ रोजी व तेव्हापासून).

# The Identification of Prisoners Act, 1920

## कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquittal | दोषमुक्ती | [S. 7 M.N.] |
| bar of suits | दावारोध | [S. 9 M.N.] |
| convict | सिद्धदोष | [Long Title] |
| conviction | दोषसिद्धी | [S. 3 (a)] |
| discharge | विनादोषारोप | [S. 7] |
| lawful | विधिसंमत | [S. 6(1)] |
| punishable offence | शिक्षेसपात्र असलेला अपराध | [S. 4] |
| rigorous imprisonment | सश्रम कारावास | [S. 4] |
| trial | न्यायचौकशी | [S. 7] |

# कैद्यांची ओळख पटविण्याबाबत अधिनियम, १९२०

# The Identification of Prisoners Act, 1920

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| दावारोध | bar of suits | [क. ९ स.टी.] |
| दोषमुक्ती | acquittal | [क. ७ स.टी.] |
| दोषसिद्धी | conviction | [क. ३ (क)] |
| न्यायचौकशी | trial | [क. ७] |
| विधिसंमत | lawful | [क. ६(१)] |
| विनादोषारोप | discharge | [क. ७] |
| शिक्षेस पात्र असलेला अपराध | punishable offence | [क. ४] |
| सश्रम कारावास | rigorous imprisonment | [क. ४] |
| सिद्धदोष | convict | [दीर्घ शीर्षक] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई